**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**

**दिनांक :-०९/०७/२०२६**

**कोटेशन नोटीस**

भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि.१६/०७/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती मा. उप अभियंता (यांत्रिकी) तथा वाहन विभाग प्रमुख सो., वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा आधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोटेशन सादर करताना सोबत पॅन क्रमांक, वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर सादर करणे बंधनकारक आहे.

---

**महानगरपालिकेचे वाहन क्र.एमएच-०४-एलक्यु-४४४२ (टाटा एलपीटी १२१६) (मॉडेल सन २०२३) या टँकर वाहनास नविन फायटर इंजिन फिटींग करणे .**

**१) फायटर इंजिन नविन फिटींग करणे :-** १) इंजिन आणि वॉटर पंपचे कपलिंगचे पट्टे खोलुन तसेच इंजिन फाऊंडेशन नट बोल्ट खोलुन चैन पुल्लीच्या साहयाने इंजिन गाडीवरुन खाली उतरविणे. २) सदर इंजिनचा जुना इंजिन ऑईल ड्रेन प्लगने बाहेर काढुन डिझेल टाकी ते फाऊंडेशनचे नट खोलुन तसेच फिल्टर ते टँकचा पाईप खोलुन टाकी बाहेर काढणे. ३) सदर इंजिनला पुर्णपणे डिसमेंटलिंग करुन डिझेल वॉश करुन शँम्पु ने वॉश करणे. ४) सदर इंजिनचा नोझल आणि पंपच्या दुरुस्ती साठी पाठविणे. ५) सदर इंजिनचे मेन स्लीव, पिस्टन, कनेक्टींग रॉड, कनेक्टींग बेरींग, CR बेरींग, मेन बेरींग चेक करणे. ६) पुश रॉड, हेडचे वाल्व, वाल्व स्प्रिंग, वाल्व गाईड चेक करणे. तसेच सर्व पॅकिंग व ऑईल सिल पाहणी करणे. ७) सर्व प्रथम क्रॅकशॉफ्टला लेथ मशिनवर पाठवुन शॉफ्ट व्यवस्थित आहे किंवा नाही (थ्रु करणे) हे चेक करुन शॉफ्ट योग्य असल्यास ज्या ठिकाणी बेरींग फिटींग होते तेथे पॉलिश करणे. ८) सदर वाहनचा इंजिनची दुरुस्ती कामी स्टँडर्ड कंपनीचे ०२ नग मेन बेरींग, ०१ नग CR बेरींग, कनेक्टींग बुश, मेन स्लीव, पिस्टन, पिस्टन रिंग, ऑईल सिल ०३ नग, फिटींग करुन गिअरला नविन पॅकिंग लावणे. ९) हेड दुरुस्ती कामी प्रेसच्या साहयाने वाल्व गाईड काढुन त्याजागी नविन वाल्व गाईड फिटींग करुन नविन ०२ नग वाल्व, वाल्व स्प्रिंग, वॉल्व लॉक फिटींग करुन दोन्ही वाल्व ला वाल्वसीट मारुन वाल्वची दुरुस्ती करुन नविन हेड गॅसकेट फिटींग करणे. १०) नोझल व पंपचे प्रेशर मिसिंग होत असल्याने नविन प्लॅन्सर व नविन इलेमेन्ट फिटींग करुन तसेच नविन ओरिंग फिट करुन मशिनच्या साह्याने प्रेशर सेट करुन नविन डिझेल पाईप ०२ नग, फिल्टर असेंबली फिटींग करुन डिझेल टाकी फिटींग करणे. ११) सदर इंजिनमध्ये स्टँडर्ड कंपनीचे २०W ४० = ३ ½ लि. ऑईल भरुन सदर इंजिन सुरु करणे.

**वॉटर पंप नविन फिटींग करणे :-** वॉटरपंपची बेरींग ६३०५, मेन शॉफ्ट EN ८ मटेरिअल, ग्लॉड दोरी, पॅकिंग फिटींग करुन ०३ नग कपलिंग ब्लेट, ३१८" x २ ½" Nut Bolt Washer ०६ नगने पंप फिटींग करुन दुरुस्ती करणे.

**उप अभियंता (यांत्रिकी)**
**तथा वाहन विभाग प्रमुख**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

---

**दिनांक ०९/०७/२०२६**

खालील ठिकाणी प्रसिध्द केली.

१) मनपा संकेतस्थळ